FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** धुळे शहर
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0518 **Year (वर्ष):** 2026
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 18/11/2026 19:29

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
Time Period (कालावधी):
Date From (दिनांक पासून): 16/11/2026
Date To (दिनांक पर्यंत): 18/11/2026
Time From (वेळेपासून): 13:38 बजे
Time To (वेळेपर्यंत): 15:34 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
Date (दिनांक): 18/11/2026 **Time (वेळ):** 19:17 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ):**
Entry No. (नोंद क्र.): 020
Date & Time (दिनांक आणि वेळ): 18/11/2026 19:17 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** कमलाबाई कन्या हायस्कुलच्या समो

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सचिन शालीकराव साळुंखे

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : शालीकराव साळुंखे

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	लाचलुचपत प्रति विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	लाचलुचपत प्रति विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation** (व्यवसाय): नोकरी

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9403747157

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	विक्रमसिंग भगवानसिंग गोठवाल		वडील का नाम : भगवानसिंग गोठवाल	1. वाडीभोकर रोड,श्रीराम कलनी, देवपुर, धुळे,देवपुर पश्चिम,धुळे, महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
1	नाणे आणि चलन	भारतीय- रुपया	1,000/रूपयेलाच स्विकारली व हस्तगत केलेली रक्कम	1,000.00

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

1,000.00

11. Inquest Report / U.D. case No., If any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12. First Information contents (प्रथम खबर हकीकत):

धुळे शहर पोलीस स्टेशन, गु.र.नं.518 /2026 भ्र.प्र.का. सन 1988 चे कलम 7 प्रमाणे

मी सचिन शालीकराव साळुंखे, वय 40 वर्षे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस उप अधीक्षक या पदावर सुमारे दोन वर्षापासुन कार्यरत आहे. दि.16.11.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना तक्रारदार महेंद्र पुंडलीक पाटील यांनी आमचे कक्षात समक्ष हजर राहुन त्यांचेकडे काळखेडे, ता. जि. धुळे येथील तलाठी विक्रम गोठवाल हे लाचेची मागणी करीत असल्याचे सांगितल्याने आम्ही मा. उप विभागीय अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग उप विभाग क्र. 42, धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडील दोन शासकिय कर्मचारी श्री. धिरज कैलास पाटील, शाखा अभियंता व श्री. प्रभाकर विलास पाटील, स्थापत्य अभियांत्रिकी यांना उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तसेच कार्यालयात हजर असलेले तक्रारदार महेंद्र पुंडलीक पाटील यांना पोकॉ. रामदास बारेला व दोन्ही पंचांची ओळख करुन दिली.

त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव महेंद्र पुंडलीक पाटील, वय 43 वर्षे, व्यवसाय नोकरी व शेती, रा. काळखेडे, ता. जि. धुळे असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली. त्यानंतर त्यांनी सांगितलेली तक्रार त्यांचे हस्ताक्षरात लिहुन दिली ती पुढील प्रमाणे "मी दि.13.11.2026 रोजी अज्ञान पालन कर्ता म्हणुन माझा मुलगा प्रशांत महेंद्र पाटील याचे नांवे मौजे काळखेडे, ता. जि. धुळे येथील गट नं. 50/5, क्षेत्र 30 आर ही शेतजमीन खरेदी केली आहे. सदर खरेदीखतावरुन सदर शेतजमीनीच्या 7/12 उताऱ्यावर माझया मुलाचे नांव लावण्यासाठी मी आज दि.16.11.2026 रोजी धुळे येथील गरुड कॉम्प्लेक्स मधील तलाठी कार्यालयात जावुन काळखेडा तलाठी विक्रम गोठवाल यांची भेट घेवुन त्यांना सुची क्र.2 जोडुन अर्ज दिला. तेव्हा त्यांनी मला "खरेदीखतावरुन 7/12 उताऱ्यावर नोंद घेण्यासाठी 1,000/- रुपये द्यावे लागतील, त्याशिवाय मी नोंद घेणार नाही" असे सांगितले, तेव्हा मी त्यांना आता माझयाकडे पैसे नाहीत, मी पैसे घेवुन आपणास भेटण्यास येतो असे सांगुन तेथुन निघुन आलो आहे.

मला तलाठी विक्रम गोठवाल यांना त्यांच्या मागणी प्रमाणे लाच देण्याची मनापासुन इच्छा नाही. तसेच त्यांचेशी कोणताही आर्थिक व्यवहार अथवा वाद विवाद नाही.

मी आज दि.16.11.2026 रोजी धुळे येथील गरुड कॉम्प्लेक्स मधील तलाठी कार्यालयात तलाठी विक्रम गोठवाल यांना भेटण्यास जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपल्या विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी ही विनंती आहे." अशी लेखी तक्रार दिली. सदर तक्रारीवर व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांवर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर पडताळणी कार्यवाही बाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन तलाठी विक्रम गोठवाल यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार महेंद्र पाटील व पंच नं. 01 धिरज पाटील यांना रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 1 असे धुळे ला.प्र.वि. कार्यालयात परत आले. तेव्हा आम्ही पंच नं. 01 धिरज पाटील यांना विचारणा केली असता त्यांनी ते व तक्रारदार असे तलाठी गोठवाल यांची भेट घेण्यासाठी धुळे येथील गरुड कॉम्प्लेक्स मधील तलाठी कार्यालयात दुचाकीने रवाना झाले, तेव्हा रस्त्यात जिल्हा परिषद कार्यालयासमोरील स्टेट बँकेजवळ तलाठी गोठवाल यांची तक्रारदार यांचेशी भेट झाली. तेव्हा त्यांच्यात तक्रारदार यांच्या कामाबाबत चर्चा झाली. तेव्हा तलाठी गोठवाल यांनी हाताच्या इशाऱ्याने तक्रारदार यांना पैशांबाबत खुणविले. तेव्हा तक्रारदार यांनी किती देवु? असे त्यांना विचारले असता त्यांनी तक्रारदार यांच्याकडे 1,000/- रुपये लाचेची मागणी करुन दि. 17.11.2026 रोजी अजंग गावी आणुन देण्यास सांगितले, अशी हकिगत सांगितली. त्यानंतर तक्रारदार यांनी देखील पंच नं. 01 पाटील यांनी सांगितल्याप्रमाणेच हकिगत सांगितले.

त्यानंतर दि.17.11.2026 रोजी तलाठी गोठवाल यांनी तक्रारदार यांना फोन करुन दि.18.11.2026 रोजी पैसे घेवुन येण्यास सांगितल्याचे तक्रारदार यांनी आम्हास कळविल्याने आम्ही आज दि.18.11.2026 रोजी सापळा आयोजित करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा तक्रारदार यांनी 200/- रुपये दराच्या 5 नोटा, असे 1,000/- रुपये हजर केले. त्यानंतर सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन तक्रारदार महेंद्र पाटील व पंच नं. 01 धिरज पाटील यांना धुळे शहरातील गरुड कॉम्प्लेक्स येथील तलाठी कार्यालयात तलाठी विक्रम गोठवाल यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार यांच्या दुचाकीने रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 2 प्रभाकर पाटील, पोकॉ. रामदास बारेला व चापोकॉ. जगदीश बडगुजर असे खाजगी कारने ला.प्र.वि. कार्यालयातुन रवाना होवुन धुळे शहरातील कमलाबाई कन्या हायस्कुल समोरील गरुड कॉम्प्लेक्स जवळ जावुन कमलाबाई कन्या शाळेच्या समोर आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने समोरच असलेल्या चहाच्या टपरीवरुन तक्रारदार यांनी त्यांच्या डोक्यावरील टोपी काढुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा पंच नं. 01 धिरज पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे तलाठी गोठवाल यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाच स्विकारुन त्यांच्या शर्टाच्या डाव्या खिशात ठेवुन घेतलेली 1,000/- रुपये लाचेची रक्कम आमचे सुचनेवरुन पंच नं. 02 प्रभाकर पाटील यांनी ताब्यात घेतली. त्यावेळी आमचे सुचनेवरुन पोकॉ. रामदास बारेला यांनी त्यांचे दोन्ही हात मनगटापासुन धरुन तलाठी गोठवाल यांना ताब्यात घेतले. त्यानंतर ला.प्र.वि, धुळे कार्यालयात येवुन तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

अशा प्रकारे तक्रारदार महेंद्र पुंडलीक पाटील यांनी त्यांच्या मुलाच्या नावे खरेदी केलेल्या शेतजमीनीच्या 7/12 उताऱ्यावर त्यांच्या मुलाचे नाव लावण्यासाठी खरेदीखताची नोंद घेण्यासाठी विक्रमसिंग भगवानसिंग गोठवाल, ग्राममहसुल अधिकारी (तलाठी), काळखेडे, ता. जि. धुळे यांनी तक्रारदार यांच्याकडे 1,000/- रुपये दि. 16.11.2026 रोजी लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम दि.18.11.2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडून स्वत: स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Archna Supadu patil(I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.**(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Archna Supadu patil
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): API

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
धुळे शहर पोलीस स्टेशन